भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

सुलभ ओवीबद्ध रचना

अध्याय नववा , भाग दुसरा



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

साहित्य प्रतिष्ठान®

भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

अध्याय नववा : भाग दुसरा

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)

२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com

ई प्रकाशन :

ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

E Sahity Pratishthan

Eleventh floor(G1102)

Eternity

Eastern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख

©श्री विजय पांढरे(२०१२)

या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.

प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भेट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

मीच प्रकटतो पंचभुते होऊन । नामरूप आकार घेऊन । विश्वाचे ते प्रकटन । माझेठायी ॥२६७॥
येथे जे जे भासे । ते माझेच स्वरूप असे । येथे माझ्यावीण नसे । अन्य काही ॥२६८॥
जयाचे बा अंगेसंगे । प्रकृति प्रकटे घेऊन अष्टांगे । जन्मा घालत असे जगे । तो पिता मी ॥२६९॥
अर्धनारी नटेश्वरी । जो पुरूष तोचि नारी । तेवि मी चराचरी । माताही होय ॥२७०॥
जगाचे ते होणे । नि जगाचे ते वाढणे । ते माझ्याचि कारणे । जाण अर्जुना ॥२७१॥
इये प्रकृतिपुरुष दोन्ही । उपजली ज्या आंतरमनी । तो पितामह त्रिभुवनी । विश्वाचा मी ॥२७२॥
मार्ग जे वेगळे भासती । ते मजसीच येऊन मिळती । दर्शन द्रष्टा दृश्याची गती । माझेच ठायी ॥२७३॥
मजठायी येता मतांतरे मिटती । सर्व शास्त्रे एकत्व पावती । एकमेका मग ओळखती । जाणता मज ॥२७४॥
ब्रह्मबीजातून प्रकटे अंकुर । घोष ध्वनी नाद आकार । तयांचा उगम जो ओंकार । तोही मीच ॥२७५॥
त्या ओंकाराकारणे । चार वाचांचे प्रकटणे । वेदांचेही उपजणे । मजठायी ॥२७६॥
वेद ते तिन्ही । प्रकटती माझेच ठिकाणी । शब्दब्रह्माची उपजणी । माझेच ठायी ॥२७७॥
हे चराचर आघवे । जेथून ते प्रसवे । नि अंती जेथे विसावे । ते ठिकाण मी ॥२७८॥
जयाचे कारणे प्रकृति जिये । जयाचे कारणे हे विश्व विये । जो भोगी प्रकृति इये । ते तत्त्व मी ॥२७९॥
मी विश्वाचा कर्ता । मीच विश्वाचा धारिता । मीच गोसावी समस्ता । या जगती ॥२८०॥
आकाशे सर्वत्र वसावे । वायूने अखंड वाहावे । अग्नीने जाळावे । नि वर्षावे पाण्याने ॥२८१॥
पर्वतांनी बैठक न सांडावी । सागरे सीमा न ओलांडावी । पृथ्वीने ओझी वहावी । ही आज्ञा माझी ॥२८२॥
म्या बोलविल्या वेदू बोले । म्या चालविल्या सूर्य चाले । म्या हालविल्या प्राणू हाले । मी स्वामी जगाचा ॥२८३॥
मी त्या यमा नेमतो । जो प्राण्यांसी ग्रासतो । कारभार विश्वाचा चालतो । ती माझीच मर्जी ॥२८४॥
ऐसा जो समर्थ । तो मीच जगाचा नाथ । गगना जैसा साक्षीभूत । मी अर्जुना ॥२८५॥
अवघ्या या नामरूपात । मीच भरला आहे चराचरांत । सर्व त्या घडामोडी होत जात । माझे कारणे ॥२८६॥
जलतरंगाचे अभिन्नपण । तैसे मी आणि विश्व जाण । सकल विश्वाचे प्रकटन । माझेच ठायी ॥२८७॥
जो मज होय अनन्यशरण । त्याचे निवारी मी जन्ममरण । घेत असे माझ्यात सामावून । मीच त्याला ॥२८८॥
मी एक आणि अनेकपण । जे वेगळे प्रकृतीचे गुण । सर्व जगाचा तो प्राण । मीच अर्जुना ॥२८९॥
सागर वा डबके न जाणता । सर्वत्र सूर्य प्रतिबिंब राबता । तैसे ब्रह्मापासोनी सर्व भुता । प्रसवी मी ॥२९०॥
मीच गा पांडवा । या त्रिभुवनाचा वोलावा । खेळ उत्पत्ती लयाचा आघवा । माझेच ठायी ॥२९१॥
बीजातून झाड उगवते । ते बीजच झाड बनते । तैसे विश्व होते जाते । संकल्पाकारणे ॥२९२॥
ऐसा जो आदिसंकल्प । अव्यक्त जो वासनारूप । कल्पांती सर्व सामावती आपोआप । माझेच ठायी ॥२९३॥
नामरुपे लया जाती । वर्ण व्यक्ती आटती । जेथे भिन्नतेचे भेद फिटती । तो ओंकार मी ॥२९४॥
ते समस्त वासना संस्कार । पुन्हा रचावया चराचर । जेथे राहोनी असती अमर । ते स्थान मी ॥२९५॥
मीच सूर्य होतो । नि सर्वांना तापवतो । मग इंद्र होऊन वर्षतो । या जगती ॥२९६॥
अग्नी काष्ठे खाये । ते काष्ठचि अग्नी होये । तैसे मरते मारिते पाहे । स्वरूप माझे ॥२९७॥
मृत्यू आणि जनन । ते माझेच रूप जाण । सर्वांभुती जे चैतन्य चिरंतन । ते मीच अर्जुना ॥२९८॥
ऐसे किती वेळा सांगावे । विश्व मीच असे आघवे । सत् असत् ते जाणावे । मीच गा ॥२९९॥
म्हणोनि अर्जुना मी नसे । ऐसा कवणू ठाव असे । परि प्राणियांचे दैव कैसे । जे न देखती माते ॥३००॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

तरंगास पाणी कारण । प्रकाश प्रकटे ज्योतीतून । तैसे विश्वाचे प्रकटन । माझेठायी ॥३०१॥
हे जग मिया कोंदले । सर्व मीच निर्मिले । कैसे कर्म तयाचे आले । जे म्हणती मी नाही ॥३०२॥
स्वत:च अमृत असून । आपले आपल्या विस्मरण । मग स्वत:सी मर्त्य मानणं । दुर्दैव ते ॥३०३॥
जसे भुकेच्या कारण । अंध धावे सैरभैर होऊन । आणि जाई चिंतामणी लाथाडून । अंधत्वाकारणे ॥३०४॥
अर्जुना विसरता त्या ज्ञानाते । ऐसीच दशा होते । नको ते केले जाते । ज्ञानाअभावी ॥३०५॥
आंधळ्या जरी गरुडपंख लाभले । ते काय तया कामा आले । तैसे सत्कर्म वाया गेले । ज्ञानेवीण ॥३०६॥
कर्मठांच्या आचरणावरून । ठरते येथे धर्माचरण । योग्य अयोग्याची शिकवण । सांगती ते ॥३०७॥
करता फलासक्त भजन पूजन ।वेदही करती तया नमन ।त्या भजनाचे फलप्राप्त होणं । अनिवार्य अर्जुना ॥३०८॥
ऐसा करता सकाम जपजाप ।आपणच असून परमात्म स्वरूप ।तयांनी पुण्याचे नावे पाप । जोडिले असे ॥३०९॥
जे वेद तिन्ही अभ्यासती । शेकडो सकाम यज्ञ करती । ते स्वर्गास बा जाती । टाळून मजला ॥३१०॥
तयांनी बसून कल्पतरूच्याखाली । झोळीस गाठ पक्की दिली ।आणि भिक्षेस ती निघाली ।स्वारी त्यांची ॥३११॥
मनी इच्छा धरून । भजन पूजन होणं । ते पापच की करणं । पुण्य समजून ॥३१२॥
मजसी ते लाथाडती । नि स्वर्ग सुख भोगती । ऐसी स्वत:चीच हानी करती । हे अज्ञजन ॥३१३॥
दु:ख नाव जया नरकात । म्हणती सुख स्वर्गात । सुख आणि दु:खाच्या अतीत । स्वरूप माझे ॥३१४॥
जाणून घे अर्जुना । या पापपुण्य द्वैत कल्पना । स्वर्ग आणि नरक दोहोंना । त्यागणे हिताचे ॥३१५॥
स्वर्ग पुण्यात्मक पाप । नरक पापाचेही पाप । सोडता पाप पुण्याचा जप । प्राप्ती माझी ॥३१६॥
ज्या पुण्याच्या कारणे । घडे मजपासून दुरावणे । तया जो पुण्य म्हणे । झडो जीभ त्याची ॥३१७॥
ऐसे जे संस्कारीत । जे सकाम भजन करतात । ते स्वर्ग लोक भोगतात । त्यागून मजला ॥३१८॥
मग मी न पाविजे ऐसे । जे पापात्मक पुण्य असे । त्या पापात्मक पुण्यासरीसे । स्वर्गा जाती ॥३१९॥
जेथे अमरत्व हेच सिंहासन । ऐरावतासारखे वाहन । राजधानी भुवन । अमरावती ॥३२०॥
जेथे महासिद्धींची भांडारे । अमृताची कोठारे । जिये गावी खिल्लारे । कामधेनुची ॥३२१॥
करण्या सेवा नियुक्ती देवांची । जी भूमी असे चिंतामणीची । बगीचे कल्पवृक्षांची । असती तेथे ॥३२२॥
गंधर्व गाती गाणी । तेथे रंभा रंगे नर्तनी । उर्वशी मुख्य विलासिनी । उपलब्ध तेथे ॥३२३॥
शयनगृही तेथे मदन । चंद्र शिंपत असे चांदणं । दूत जैसे पवन । धावती तेथे ॥३२४॥
बृहस्पतीसारखे ब्राह्मण । देती तेथे आशीर्वचन । पंगतीला असती देवगण । रोज अर्जुना ॥३२५॥
लोकपाल अष्ट दिशांचे । श्रेष्ठ अशा पदवीचे । अश्व उच्चै:श्रवा जातीचे । चालती पुढे ॥३२६॥
हे भोग बहू ऐसे । जे इंद्रसुखासरीसे । ते भोगता होत असे । पुण्यक्षय ॥३२७॥
तया पुण्याची पाऊटी सरे । मग स्वर्गातून खाली उतरे । आणि येऊन पडे माघारे । मृत्युलोका ॥३२८॥
जे वेश्येवर धन संपविती । संपता दारीही उभे न करी ती । ऐसी या दीक्षितांची स्थिती । काय सांगो ॥३२९॥
ऐसे मज जे डावलती । पुण्य इच्छून स्वर्ग भोगती । पुण्याची संपता गती । जन्मती मृत्युलोका ॥३३०॥
मातेच्या उदरात । नि विष्ठेच्या संगतीत । नऊ मास हाल भोगीत । अडकती भवचक्री ॥३३१॥
जे स्वप्नीचे बा धन । जागता जाई हारपून । तैसे हे स्वर्गसुख जाण । या वेदज्ञांचे ॥३३२॥
अर्जुना वेद जरी अभ्यासिला । माते नेणता वाया गेला । धान्य सांडून उपणला । कोंडा जैसा ॥३३३॥
म्हणून मज जाणल्यावीण । केवळ वर वर वेद आचरण । ते भवचक्रीच फिरणं । जाण अर्जुना ॥३३४॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

मजसी अर्पून प्राणाते । निर्विकल्प होऊन चित्ते । जैसे पोटातील गर्भाते । प्रयत्न नाही ॥३३५॥
जैसे मी वाचून काही । जया मनी ओढ नाही । तन-मन-धन सर्वथाही । अर्पिले मज ॥३३६॥
ऐशा अनन्य रीतीने । तयांनी मज चिंतणे । मग तयांची सेवा करणे । कर्तव्य माझे ॥३३७॥
ऐसे शरण मज येता । वाहतसे मी तयांची चिंता । भार तयांचा माझ्या माथा । आपोआप ॥३३८॥
मग घेणे तयांची काळजी । ती जबाबदारी माझी । जशी चिंता पक्षिणीमाजी । पडे पिल्लांची ॥३३९॥
तिने तहानभूक विसरून । पिल्लांची काळजी घेणं । तसे भक्तांचे कल्याण पाहणं । कर्तव्य माझे ॥३४०॥
जयाना माझ्या एकरूपतेची आवड ।पुरवी मी तयांचेही लाड । तयाच्या सेवेस देतो जोड । प्रेमाची माझ्या ॥३४१॥
जो जो भाव ते मनी धरती । मीच करी तयाची पूर्ती । धावे मी तयांच्या मदती । अहोरात्र ॥३४२॥
तयांची काळजी सारी । वाहे मी माझीया शिरी । तयांच्या निर्वाहाची जबाबदारी । माझ्यावर ॥३४३॥
अन्य अनेक संप्रदाय असती । जे मजसी न जाणती । ते अन्य देव भजती । अज्ञाना कारणे ॥३४४॥
इतर देवतांचे हे भजन । जरी माझेच मी सर्वत्र असल्यानं । परि न होई तया ज्ञान । माझे स्वरूपाचे ॥३४५॥
वृक्षा असती खोड फांद्या पाने । ते वृक्षाचेच असणे । परि पाणी शोषू जाणे । केवळ मूळ ॥३४६॥
अर्जुना इंद्रिय दहा दिसती । ते एका देहीच वसती । परि तयांचे विषय असती । भिन्न भिन्न ॥३४७॥
करून उत्तम पाककृती । कोणी का कानी घालती । फुले का कोणी बांधती । डोळ्यांना कधी ॥३४८॥
रस तो मुखानेच सेवावा । सुगंध तो नाकानेच घ्यावा । तसा मी तो भजावा । मीच होऊन ॥३४९॥
मज न जाणता भजन । ते वायाचि गा अज्ञान । म्हणोनी कर्माचे डोळे ज्ञान । ते निर्दोष असावे ॥३५०॥
एऱ्हवी बा पंडुसुता । या भजन यज्ञा समस्ता । मी वाचूनी भोक्ता । कोण आहे ॥३५१॥
मीच सर्वांचा आदि अंत । परि ते न मला पावतात । जे इतर देवा भजतात । दुर्बुद्धि कारणे ॥३५२॥
गंगेचे उदक जैसे । अर्पिती पितरांच्या उद्देशे । भजन तयांचे तैसे । सकाम अर्जुना ॥३५३॥
म्हणूनी हे पार्था । ते न मज पावती सर्वथा । जी तया मनी आस्था । तेथेच पोहचती ॥३५४॥
मन वाचा इंद्रियानं । करती ज्या देवाचं भजन । मिळती ते तया जावून । मृत्यू येता ॥३५५॥
अथवा पितरांची व्रते । वाहती जयांची चित्ते । जीवित सरलिया तयांते । पितरच होती ॥३५६॥
का क्षुद्र देवतादि भुते । जी तयांची परमदैवते । संपूर्ण जीवनभर ते । उपासले ज्यांना ॥३५७॥
जेधवा मृत्यू घडी आली । आणि भूतत्वाची प्राप्ती जाहली । ऐसे संकल्पवशे फळली । कर्मे तयांची ॥३५८॥
जे सर्वत्र मला पाहती । सर्वत्र मजसीच ऐकती । मनी मजसीच भजती । सर्व काळ ॥३५९॥
सर्वांगी सर्वाठायी । मीच नमस्कारिला जीही । करती दान पुण्य जे काही । माझेच साठी ॥३६०॥
जयांनी ऐसे अध्ययन केले । जे आत बाहेर मीच झाले । तयांचे जीवित्व जडले । माझे ठायी ॥३६१॥
जे ऐसा अहंकार वाहतात । स्वत:स माझे दास म्हणतात । सर्व काही ते करतात । केवळ माझेसाठी ॥३६२॥
जे माझेनि कामे सकाम । जे माझेनि प्रेमे सप्रेम । जे माझिया भुली सभ्रम । नेणती दुजे ॥३६३॥
मजसाठी जयांची शास्त्रे । मी जोडे तयांचेनि मंत्रे । ऐसे जे चेष्टामात्रे । भजले मज ॥३६४॥
ऐसे जीवन समयात । जे मजसी एकत्व पावतात । ते मजसीच मिळतात । मृत्यूसमयी ॥३६५॥
म्हणून मीच जे जाहले । ते माझीया एकत्वा आले । जयांनी जीवित्व सांडले । माझेसाठी ॥३६६॥
मजसी एकत्व पावणे । तीच माझी पूजा असणे । अन्य कोणाही उपचाराने । नाकळे मी ॥३६७॥
मी जाणले ऐसे म्हणतो । तो काहीच न जाणतो । जो मोठेपण मिरवतो । तो काहीच नाही ॥३६८॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

विधि यज्ञ आणि दान । जप तपादि साधन । तया किंमत एका काडीहून । जास्त नाही ॥३६९॥
पहा अर्जुना वेदाहून । आहे का कुणी बुद्धिवान । का तोंडाळ शेषाहून । असे कोणी ॥३७०॥
शेष मज अंथरुणाखाली दडला । वेद नेति नेति म्हणाला । आणि त्या सनकादिकाला । पिसे लागले ॥३७१॥
तपस्व्यांची ऐक कहाणी । कोण आहे शंकरावानी । गंगा जी निघे मज चरणातूनी । वाहे माथा ॥३७२॥
संपन्नतेचा कळस ऐसी । कोण आहे लक्ष्मी जैसी । श्रियेसारख्या दासी । घरी जिच्या ॥३७३॥
त्या दासी खेळ खेळती घरकुली । तया नामे अमरावती ठेविली । पहा इंद्रादिक जाहली । बाहुले त्यांची ॥३७४॥
त्या डाव जेव्हा मोडतात । इंद्राचेही रंक होतात । ज्या झाडास त्या पाहतात । ते होती कल्पवृक्ष ॥३७५॥
ऐसे सामर्थ्य जिच्या दासींचे । येथे काहीच न चालते त्या लक्ष्मीचे । म्हणून मन काया वाचे । वरे मजसी ॥३७६॥
मग सर्वस्वे करूनी सेवा । अभिमान सांडून पांडवा । माझे पाय चेपण्याच्या दैवा । पात्र झाली ॥३७७॥
ऐसे मीपणा तो त्यागून । पांडित्य आपले विसरून । होता लहानाहून लहान । प्राप्ती माझी ॥३७८॥
सूर्याच्या त्यादृष्टीने । चंद्रही फिकाच असणे । मग गर्व त्या काजव्याने । करावा कैसा ॥३७९॥
जेथे लक्ष्मीचे थोरपण अपुरे ।आणि शिवाचे तपही न पुरे ।तेथे कैसे जाणतील जीव सारे । अर्जुना मजला ॥३८०॥
शरीरासी तादात्म्य तोडून । मन गुणातीत होऊन । जीवभाव संपणं । कल्याणदायी ॥३८१॥
मग निस्सीमभाव उल्हासाने । फल भक्ताने मज अर्पणे । स्वीकारी मी ते आवडीने । सर्वकाही ॥३८२॥
भक्त मज फल अर्पितसे । आणि मी आवडीने घेत असे । नि आदरे खातसे । फल कोणतेही ॥३८३॥
भक्तिचेनि नावे । फूल मज एक द्यावे । खरे तर मी ते सुंगावे । परि मुखीचि घाली ॥३८४॥
कोणतीही असो फूल । जर भक्तिभावाने अर्पिलं । मग ते मजठायी पावलं । आपोआप ॥३८५॥
असे व्याकुळ जो भुकेने । होतसे संतुष्ट तो अमृतसेवनाने । तैसे सेवितसे मी पाने । आवडीने ॥३८६॥
पानही न मिळाले जर । उदक तर उपलब्ध अपार । आवडीने करी मी स्वीकार । उदकाचाही ॥३८७॥
मोल न पडते पाण्यास । ते उपलब्ध विनासायास । मनी धरून भक्तिभावास । अर्पावे मज ॥३८८॥
तयाने वैकुंठाहून सुंदर । मजसाठी बांधले मंदिर । जसे कौस्तुभाहून तेजस्वी अलंकार । दिले मजसी ॥३८९॥
क्षीरसागराहून सुंदर । अप्रतिम जे शय्यागार । मजसी दिले ते अपार । त्याने अर्जुना ॥३९०॥
कर्पूर चंदनाचा लेप । जयासी सुगंध अमूप । तयाने लाविला दीप । सूर्या जैसा ॥३९१॥
गरुडासारखे वाहन । वा कल्पवृक्षांचे उद्यान । कामधेनुसारखे गोधन । अर्पिले त्याने ॥३९२॥
तयाने अप्रतिम अमृताहून । दिले मज पक्वान्न । जयाने अर्पिलं भक्तिभावानं । उदक मजला ॥३९३॥
न लगे सांगावे तुजला । तू जाणतोस सुदाम्याला । पोहे जयाचे खाण्याला । आतुर मी ॥३९४॥
मी फक्त भक्तिसीच जाणे । तेथे लहानथोर न म्हणे । भक्तिभावानेच घडणे । पूजन माझे ॥३९५॥
मजसी एकत्व न जाणणे । मग वायाचि फुले आणि पाने । मजठायी एकरूप होणे । तीच भक्ती ॥३९६॥
निष्काम ते होता । घडे मजठायी एकरूपता । म्हणून सत्वर तू आता । निष्काम हो ॥३९७॥
तू जे जे करशील । वा भोग जे भोगशील । अथवा हवन करशील । यज्ञी जे जे ॥३९८॥
करशील सत्पात्री दान । वा सेवका देशील जे वेतन । अथवा तपादि अवघे साधन । अर्पावे मजसी ॥३९९॥
हे क्रियाजात आघवे । जे होत असे स्वभावे । ते भक्तिभावाने अर्पावे । मजसी अर्जुना ॥४००॥
जे जे कर्म करावे । ते माझे न म्हणावे । ऐसे कर्मी शुद्धि पावावे । अर्जुना तू ॥४०१॥
जसे बीज अग्निकुंडी टाकता । संपते ती अंकुरता । तैसे कर्मे मज अर्पिता । घडे मुक्ती ॥४०२॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

कर्माचा धरता अभिमान । तेथे अहंभावाचे प्रकटन । करावा लागे देहधारण । मीपणाकारणे ॥४०३॥
मजसी अर्पिता कर्म । संपून जाते मरण जन्म । मग दु:ख आणि श्रम । टळती अर्जुना ॥४०४॥
कर्मसिद्धांत जाणणे । जन्ममरण टाळणे । मनी निष्काम होणे । सूत्र अर्जुना ॥४०५॥
देहासी तादात्म्य तोडता । सुखदु:खी सम राहता । स्वप्न सुषुप्ति ओलांडता । एकत्व मजसी ॥४०६॥
तो मी पुससी कैसा । जो सर्वभुती साक्षी जैसा । तेथे आपपर ऐसा । भाव नाही ॥४०७॥
जे ऐसे मज जाणती । अहंकार आपुला सांडती । तेच मजसी भजती । एकत्वाने ॥४०८॥
ते वर्तत दिसती देही । एकत्व पावून मजठायी । मी तयांच्या हृदयी । समग्र असे ॥४०९॥
संपूर्ण वृक्ष जैसा । बीजातच असे लपलासा । त्या बीज वृक्षा जैसा । संबंध आमचा ॥४१०॥
अंतरी आम्ही अभेद । केवळ नामरुपाचाच भेद । नामरुपास जाणे छेद । रहस्य अर्जुना ॥४११॥
जैसे अलंकार उसने । स्त्रियांनी समारंभी घालणे । तैसे यांचे देह धरणे । जाण अर्जुना ॥४१२॥
सुगंध जाता वाऱ्यापाठी । केवळ फूल राहे देठी । तैसे प्रारब्ध भोगण्यासाठी । धरती देह ॥४१३॥
अहंकार अवघा सुटता । मजसी एकरूप होता । त्यांची माझी एकात्मता । अखंडित ॥४१४॥
मजसी एकत्व जो पावे । त्यासी न लागे शरीर धरावे । ऐसे सर्वांनी सुटावे । जन्ममरणातून ॥४१५॥
पूर्वी वाईट त्यांचे आचरण । असेना का तो दुर्जन । तो मजसी एकत्व पावून । मुक्त होई ॥४१६॥
जे माझी भक्ती करती । अंती तया उत्तम गती । ते मजसीच पावती । आयुष्य सरता ॥४१७॥
आधी जरी वाईट वागला । पण नंतर जो सुधारला । तो महापुरातून वाचला । अर्जुना जसा ॥४१८॥
किनाऱ्यावर येता । बुडण्याची संपली शक्यता । तैसी माझी भक्ति करता । कल्याण होई ॥४१९॥
तो दुराचारी जरी होता । पण मनी पश्चात्ताप प्रकटता । होई सर्व पापातून मुक्तता । त्यांची अर्जुना ॥४२०॥
ऐसा पश्चात्ताप होता । पापांचा ढीग संपता । तया अंतरी पवित्रता । प्रकटे अर्जुना ॥४२१॥
तयानेच वेद अभ्यासिला । तोच तपाठायी तपला । अष्टांगयोग बा अभ्यासिला । तयानेच ॥४२२॥
ऐसी आस्था मजठायी ठेवता । संपती कर्मे ती सर्वथा । मग पहा तो पार्था । मीच होई ॥४२३॥
ऐसे मनबुद्धि सांडता । मनी निष्काम होता । मजसी एकत्व पावता । मुक्ती अर्जुना ॥४२४॥
ऐसा तो ब्रह्ममय होतो । नि बह्ममयतेचा भावही जातो । अमृततत्त्व होऊन राहतो । तो चिरंतन ॥४२५॥
सूर्य तो उगवता । रात्र जात असे अस्ता । तैसे मजसी एकत्व पावता । घडे भक्ती ॥४२६॥
मजसी तुर्येत एकत्व पावता । माझी जवळीक पांडुसुता । तेव्हाच तो तत्त्वता । स्वरूप माझे ॥४२७॥
दीपाने दीप लावता । न ओळखता येई पहिला कोणता । तैसे मीच होऊन जाता । प्राप्ती माझी ॥४२८॥
मग माझी नित्य शांति । तया दशा तेचि कांती । ऐसे एकच होऊनि राहती । माझे ठायी ॥४२९॥
ऐसे पार्था पुढती पुढती । तेच तेच सांगू किती । म्हणून ती माझी भक्ती । सोडू नये ॥४३०॥
कुळाचा गर्व टाकावा । जातीचा अभिमान त्यजावा । पांडित्याचा भाव संपवावा । मनातून ॥४३१॥
वाया रूप तारुण्याची सुंदरता । नि जपतपाची वाच्यता । जोवरी नाही मजसी एकता । ते पालहाळ सारे ॥४३२॥
धान्य जर न लागले कणसाला । मग काय करावे पिकाला । तैसे अंतरता मज एकत्वाला । नाही भक्ती ॥४३३॥
जैसे सरोवर जे आटले । एकमेका दोन दु:खी भेटले । वा वांझ झाड ते फुलले । फळावीण ॥४३४॥
तैसे असता सकळ वैभव । अथवा कुळजाती गौरव । जसे शाबूत शरीर अवयव । जीवावीण ॥४३५॥
तैसे माझिये भक्तिवीण । जळो ते जीवन जगणं । ते तर पृथ्वीवरील पाषाण । जसे अर्जुना ॥४३६॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

हिवराची दाट सावली ती। सज्जन जाणून टाळती। तैसे पुण्ये डावलून जाती। अभक्तांते ॥४३७॥
निंबासी निंबोळ्या आल्या। त्या कावळ्यांनीच खाल्या। तसा भक्तिहीन जातो वेढल्या। दोषांनीच ॥४३८॥
पक्वान्न खापरात घेतले। वाढून चौरस्त्यात ठेवले। ते कुत्र्याचेच बा झाले। जैसे अर्जुना ॥४३९॥
तैसे भक्तिहीनाचे जिणे। जो स्वप्नीही पुण्य न जाणे। संसार दु:खासी आमंत्रणे। दिधली त्याने ॥४४०॥
कुळ असो कसेही। वा जन्म जातीत कोणत्याही। देह असता पशुचाही। हरकत नाही ॥४४१॥
गजेंद्र मगराची कथा। तुज माहीत आहे पार्था। त्या हत्तीसही मी सर्वथा। उद्धरिलेच की ॥४४२॥
नीच असेना का जाती। अधमातील अधम मती। त्या जातीत जे जन्मती। तेही योग्य ॥४४३॥
ते पापयोनि मूढ। मूर्ख जसे का दगड। परि माझ्याठायी दृढ। सर्वभावे ॥४४४॥
जे गाती माझे गुण वर्णन। जया दृष्टी माझेच दर्शन। आणि अर्पिती आपले मन। माझेठायी ॥४४५॥
माझीया किर्तीवीण। जयांचे रिते नाही श्रवण। जया सर्वांगी भूषण। माझी सेवा ॥४४६॥
ते विषय दुसरा नेणती। फक्त मजसाठीच जगती। वा मरण ते पत्कारती। माझ्यावीण ॥४४७॥
ऐसा आघवाचि परि पांडवा। जिही आपुलिया सर्वभावा। मजठायी धरता वोलावा। मीच होती ॥४४८॥
ते असेना का पापयोनि। अति अपूर्ण जे अध्ययनी। ते मजसी एकत्व पावुनी। मुक्त होती ॥४४९॥
आपल्या भक्तीचे कारणे। दैत्यांनी देवा आणले उणे। माझे नृसिंह होऊन प्रकटणे। भक्तांसाठी ॥४५०॥
प्रल्हादाची ती कथा। माझेऐवजी तयाचे नाव घेता। होई सर्व गोष्टींची प्राप्यता। नामासारखी ॥४५१॥
दैत्यकुळी प्रल्हादे जे केले। ते इंद्रासही नाही जमले। ऐसे भक्ती तत्त्व चांगले। कुळ जातीहुनी ॥४५२॥
राजाज्ञेचा ठसा उमटता। चामड्यासही येते महत्त्वता। ते चामडे चलन होता। खरेदी सकळ ॥४५३॥
राजाज्ञा ती नसता। बाजारी सोन्या-रुप्याचीही व्यर्थता। पण राजाज्ञा प्राप्त होता। चामडेही नाणे ॥४५४॥
माझ्याशी एकरूपता। तीच जीवनाची सफलता। इंद्रिय मनबुद्धि सरता। माझी गाठ ॥४५५॥
म्हणून कुळ जाती वर्ण । हे अवघेचि गा अकारण। मजसी एकरूप होणं। भक्ती आहे ॥४५६॥
जे मजठायी येती। मजसी एकरूप होती। तयांचे जन्ममरण संपती। आपोआप ॥४५७॥
जसे अनेक ते नाले। गंगेसी येऊन मिळाले। मग गंगाच ते झाले। अनायसे ॥४५८॥
खैर आणि चंदन। संपते हे भेदाचे भाषण। जेव्हा जाती ते जळून। अग्निमाजी ॥४५९॥
मजसी एकरूप होता। संपते जाती वर्णाची कथा। मजसी एकत्व पावता। भेद नाही ॥४६०॥
जाती व्यक्ती संपती । जेधवा एकरूप मजसी होती। जसे मिठाचे कण विरती। सागरामाजी ॥४६१॥
तववरीच नदी-नाल्यांची नावे। तवचि पूर्व पश्चिम म्हणावे। जव न येती आघवे। समुद्रामाजी ॥४६२॥
मजसी एकरूप होतं। प्रवेशो मजठायी तुझे चित्त। मग आपले ते एकत्व। अनादिच की ॥४६३॥
परीसाचा स्पर्श होता। लोखंडासी प्रकटते सुवर्णता। तैसे मजसी येऊन मिळता। मीच होई ॥४६४॥
प्रेमाच्या त्या कारणे। गोपींचे मजसी एकरूप होणे। मग मीच होऊन रहाणे। सदोदित ॥४६५॥
जयांनी मजसी वैर केले। नि मनी भय धरले। ते मजसीच येऊन मिळाले। शिशुपालादिक ॥४६६॥
मजसी जयांचे सोयरेपण। ते यादव गेले मजठायी विरून। एकत्व माझ्या ममत्वाकारण। वासुदेवांदिका ॥४६७॥
नारदा ध्रुवा अक्रुरा। शुका आणि सनत्कुमारा। भक्तीद्वारेच मी धनुर्धरा। प्राप्त झालो ॥४६८॥
विषय वासनेतून गोपिकाला। भयसंभ्रमातून कंसाला। घातकी बुद्धितून शिशुपालाला। प्राप्त मी ॥४६९॥
भक्ती असो की विषयता। वैराग्य असो की वैरता। स्वधर्मासी अनुसरता। प्राप्ती माझी ॥४७०॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

म्हणोनी पार्था पाही । प्रवेशावया मजठायी । येथे उपायांची नाही । कमतरता ॥४७१॥
कोणत्याही जातीत जन्मावे । भजावे वा वैर धरावे । अंती मजसी एकरूप व्हावे । सर्वांनी अर्जुना ॥४७२॥
कोणत्याही कारणे । मजसी एकरूप होणे । मग मीच होऊन रहाणे । अखंडित ॥४७३॥
सर्व या पापयोनि । येतात माझ्याच ठिकाणी । भक्तिभावे मजसी भजुनी । मीच होती ॥४७४॥
ब्राह्मण श्रेष्ठ वर्णात । स्वर्ग मिळे जया दानात । वेदविद्या असे वसत । घरी त्यांच्या ॥४७५॥
देव ते पृथ्वीवरचे । मूर्तिमंत रूप साधनेचे । भाग्य सकळ तीर्थांचे । जया ठायी ॥४७६॥
अखंड यज्ञ करून । वेदयुक्त ज्यांचे आचरण । तयांच्या आशीर्वादानं । कल्याण होई ॥४७७॥
तयांच्या आस्थेकारणं । सत्कर्मांना मिळे पोषण । आणि सत्याचं ते जिवंत राहणं । त्यांचेकारणे ॥४७८॥
जयाचेनि बोले । यज्ञी पर्जन्य प्रकटले । समुद्राने पाणी दिले आपुले । यांचेसाठी ॥४७९॥
तयासाठी मी लक्ष्मी डावलली होती । नि कौस्तुभ घेऊन हाती ।वाढवली वक्षस्थळाची महती । मी माझ्या ॥४८०॥
तयाच्या चरणाची खूण । माझे हृदयी आहे जतन । म्हणूनच असती दैवी गुण । माझेठायी ॥४८१॥
जेधवा ते कोपती । तेव्हा काळासही जाळिती । आणि तयांची कृपादृष्टी ती । सिद्धिदायी ॥४८२॥
ऐसे पूज्य जे ब्राह्मण । मजठायी अति निपुण । मजसी एकत्व पावून । राहती सदा ॥४८३॥
चंदनाच्या संगती कारण । निंबही होतसे पावन । देवही करती धारण । मस्तकी त्यांना ॥४८४॥
मग बा ते चंदन । का न मी करील धारण । तैसे मजसी एकत्व पावून । ते मुक्त अर्जुना ॥४८५॥
करण्या दाह शमन । शिवे केला चंद्र धारण । तेव्हा हलाहल प्राशन । पचनी पडले ॥४८६॥
मग शीतल जे चंदन । मी का न करावे धारण । तैसे हे ब्राह्मण । एकरूप मजसी ॥४८७॥
रस्त्यावरील पाणी वाहते । ते अंती सागरच होते । मग गंगा सागरी मिळते । ते नवल नाही ॥४८८॥
म्हणोनि राजर्षी असो वा ब्राह्मण । जे येती मजसी शरण । मग मजसी एकरूप होऊन । मीच होती ॥४८९॥
काय करू जीवभावाचे वर्णन । ते तर फुटक्या नावेत बसणं । जसे शस्त्रांचे घाव झेलणं । उघड्या अंगी ॥४९०॥
अंगावर पडता पाषाण । का न करावे कवच धारण । का टाळावे औषधप्राशन । रोग होता ॥४९१॥
वनात वणवा पेटला असता । का न करावा वाकडा रस्ता । आणि टाळण्या ही दु:खता । करावी भक्ती ॥४९२॥
कैसे विसरले हे मजला । बळी पडले ते गर्वाला । न प्राप्त होता भक्तीला । ते माझ्या ॥४९३॥
विद्या तारूण्याचा गर्व धरिती । नि मजपासून दूर जाती । आणि भोग ते भोगती । जे अशाश्वत ॥४९४॥
देहास सत्य मानून । धिक् तयांचे भोग भोगणं । जातसे देह मरून । क्षणार्धात ॥४९५॥
जीवपण दु:खाचा डोंगर । तेथे मरणाचा वावर । टाळून हा दु:खाचा बाजार । मुक्त व्हावे ॥४९६॥
ऐशा मरणाच्या ठिकाणे । कैसे बा सुखी होणे । दु:खात सुख शोधणे । मूर्खपणा ॥४९७॥
विषाचा कांदा वाटता । नि तयाचा रस सेविता । कैसी प्रकटेल ती अमरता । विषाठायी ॥४९८॥
तैसे विषयांचे सुख । ते केवळ परम दु:ख । परि हे सर्व मूर्ख । फसती तेथे ॥४९९॥
शिर तोडून आपले । पायाच्या जखमेवर बांधले । तैसे विषयभोग इथले । मृत्यू अर्जुना ॥५००॥
या मृत्युलोकाच्या ठिकाणी । नाही सुखाची बा कहाणी । कधी का विस्तवाच्या अंथरूणी । येई झोप ॥५०१॥
या लोकीचा चंद्र क्षयरोगी । सूर्य उदय अस्त भोगी । आणि सुखाच्याच अंगी । दु:ख अर्जुना ॥५०२॥
येथे सुखाच्या सोबती । होई दु:खाचीही उपस्थिती । होता गर्भाची निर्मिती । मृत्यू येथे ॥५०३॥
येथे मनी नाही ते चिंतणे । मग तैसेच बा होणे । आणि मग अखंड भटकणे । भवचक्री ॥५०४॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

येथे शोध तो घेता । न लागे कोणाचाच पत्ता । भासाची ती अखंडता । येथे अर्जुना ॥५०५॥
हे अनित्यतेचे स्थान । ब्रह्मासही येतसे मरण । क्षणार्धात जाई संपून । जीवन येथे ॥५०६॥
ऐसी अनित्य जी स्थिती । तिजला मूर्ख सुख मानती । आणि अखंड जन्ममरण घेती । मृत्युलोकी ॥५०७॥
पावण्या मजसी एकता । कवडीचीही नाही आवश्यकता । परि ओतती संपत्ती सर्वथा । जेथे हानी ॥५०८॥
जो विषयात बा गुंतला । तया म्हणती सुखी झाला । जो इच्छांखाली मेला । म्हणती त्यास ज्ञानी ॥५०९॥
जयांचे आयुष्य संपत आले । बळ प्रज्ञा सोडून गेले । तया यांनी नमस्कारिले । वडील म्हणून ॥५१०॥
जसे वय वाढते बाळाचे । कौतुक करती ते त्याचे । परि आयुष्य कमी झाल्याचे । भान नाही ॥५११॥
साजरा करती वाढदिवस । विसरून त्या काळास । व्यक्त करती उल्हास । वय सरता ॥५१२॥
मरणाची तया अति भीती । कोणी मेल्यास ते रडती । आणि जिवंतपणी न करती । सेवा त्याची ॥५१३॥
सर्पाने बेडूक अर्धा गिळला । तरी तो बेडूक धरू पाहे माशीला । तैसे यांच्या लोभाला । अंत नाही ॥५१४॥
या मृत्युलोकाच्या ठिकाणी । सारी उरफाटीच कहाणी । अर्जुना येथे जन्मूनी । फसलास तू ॥५१५॥
घडण्या मृत्युलोकाचा त्याग । तू भक्तीच्या वाटेस लाग । प्राप्त होता तो योग । मीच होशी ॥५१६॥
तू मन हे मीचि करी । माझिया भजनी प्रेम धरी । सर्वत्र मज नमस्कारी । एकतत्त्वा ॥५१७॥
मजठायी ठेवून अवधान ।मनोसंकल्प जाऊ दे जळून । मजसी मग एकत्व पावून । मुक्त होशी ॥५१८॥
मजसी एकत्व पावता । जाणशील तुझी माझी एकता । योगाची ती रहस्यता । सांगितली तुज ॥५१९॥
अवघेच रहस्य आपले । जे चोरून होते मी ठेवले । तुजसाठी पहा उघडले । हृदय माझे ॥५२०॥
ऐसे भगवंताचे बोलणे । ऐकले त्या संजयाने । मग राजास तो काय म्हणे । ऐका आता ॥५२१॥
ऐकले का तुम्ही दाता । परि म्हातारा निवांतचि होता । जैसी म्हैस पाण्यात बसता । उठेच ना ॥५२२॥
तसे संजयाने डोके हलविले । म्हणे येथे ज्ञानामृत वर्षले ।आणि पहा महाराज गेले । अनावधान गावा ॥५२३॥
हा अन्नदाता आमचा । तया दोष देता मळेल वाचा । ऐसाच बा स्वभाव याचा । दुर्दैव जे ॥५२४॥
परि बापा मी भाग्यवान । आज ऐकले आत्मज्ञान । पहा कैसी श्रीव्यासानं । कृपा केली ॥५२५॥
ऐसे मोठ्या सायासाने । बोल बोलले संजयाने । मग तो सात्त्विक भावाने । भरून गेला ॥५२६॥
मनी चकितता आली । वाणी पांगळी झाली । आणि रोमांचता प्रकटली । अपादमस्तक ॥५२७॥
आपोआप मिटले डोळे । वर्षती ते मग आनंद जळे । आणि ऊर्मीच्या नि बळे । कंप सुटला ॥५२८॥
अंगी रोमांचित झाला । घामाने चिंब भिजला । मोत्यांचा जसा घातला । अंगरखा त्याने ॥५२९॥
ऐकून त्या उपदेशा । संजयाची मिटू पाहे जीवदशा । परि आज्ञेकारण व्यासांच्या खाशा । सजग राहिला ॥५३०॥
स्मरून व्यासांची बोली । संजयास सजगता आली । देहबुद्धि जागृत जाहली । त्याची पहा ॥५३१॥
मग तयाने डोळे पुसले । आणि घामासही दूर केले । आणि मग तो बोल बोले । धृतराष्ट्राला ॥५३२॥
भगवंताचे शब्द बीज होत । संजय मशागत केलेले शेत । बघा श्रोतियांस होईल प्राप्त । ज्ञान आता ॥५३३॥
आता अवधान ते द्यावे । आणि आनंदा प्राप्त व्हावे । बाप श्रवणेंद्रिया दैवे । घातली माळ ॥५३४॥
म्हणूनी विभुतींचा ठाव । अर्जुना दाविल तो राव । तो ऐका म्हणे ज्ञानदेव । निवृत्तीचा ॥५३५॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे राजविद्याराजगुह्ययोगोनाम नवमोऽध्यायः ॥९॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट । वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वार्‌यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणार्‌या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधू नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु हृदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे हृदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com
ई-साहित्य प्रतिष्ठान®
www.esahity.com

श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळ्यांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९६७४८२०